# प्रकरण दुसरे

# इचलकरंजी शहराची व नगरपरिषदेची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी

# प्रकरण दुसरे

## इचलकरंजी शहराची व नगरपरिषदेची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी

**प्रस्तावना:—**

दक्षिण महाराष्ट्रातील इचलकरंजी हे मोठे औद्योगिक शहर आहे. या शहराला महाराष्ट्राचे मॅचेंस्टर म्हणून ओळखले जाते. हे शहर कापशी घोरपडे संस्थानाच्या इतिहासाशी निगडीत असून कोल्हापूर जिल्हातील औद्योगिक, राजकीयदृष्टया या शहराला महत्व असून तेथील नगरपालिका ही विकसीत झाली आहे. त्यादृष्टीने या शहराची व नगरपालिकेची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमीचा प्रस्तुत प्रकरणाच्या माध्यमातून आढावा घेतला आहे.

**इचलकरंजी शहराची भौगोलिक पार्श्वभूमी:—**

इचलकरंजी शहर हे भारताच्या नकाशामधील महाराष्ट्र राज्यातील दक्षिण महाराष्ट्रात असून हे शहर कोल्हापूर जिल्हयातील हातकणंगले तालुक्यात आहे. इचलकरंजी शहर कोल्हापूर शहरापासून २७ किमी तर हातकणंगले शहराच्या दक्षिण दिशेस ९ किमी अंतरावर वसलेले आहे. या शहराच्या जवळून पंचगंगा नदी वाहत असून तिचे अंतर शहरापासून १.५ किमी एवढे आहे. इचलकरंजी शहराचे पूर्वीचे क्षेत्रफळ २४० चौ. मैल होते आणि त्या शहरात ७८ खेडी सामावलेली होती. इचलकरंजी शहराचा विस्तार २६.४० अंश उत्तर अक्षांश व ७४.३२° अंश पूर्व रेखांक्ष आहे. या शहराचे भौगोलिक स्थान समुद्रसपाटीपासून ५५६ मीटर उंचीवर असून नगरपरिषदेची स्थापना झाल्यानंतर या शहराची हद्दीक्षेत्र २९.८४ चौ. किमी अहे. इचलकरंजी शहराचे तापमान कोरडे असून शहर हे मध्यम पर्जन्य वृष्टीच्या मौसम्मात येते.

इचलकरंजी शहराची २००१ च्या जणगणनेनूसार २.५७ लाख इतकी असून २०११ साली ती २.८७ लाख झाली आहे. या शहराला औद्योगिक शहर म्हटले जात असून येथील मुख्य व्यवसाय यंत्रमागावर कापड तयार करणे हा आहे.

**इचलकरंजी शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी:—**

इचलकरंजी शहराची निर्मिती सुरूवातीला सात खेड्यातून झालेली दिसते. ज्यामध्ये इंची, उंची आणि करंजी अशी तीन गावे प्रथमत: एक झाली आणि त्यातून इचलकरंजी असे नाव पडले. काही ऐतिहासिक दस्ताऐवजनूसार हे शहर सुरूवातीला जंगलव्याप्त असे होते. व या जंगलात करंजीची झाडे मोठया प्रमाणात होती. या जंगलाच्या लगतच्या गावाचे नाव इंची होते यावरून इचलकरंजी नाव रूढ झाले.

इचलकरंजी या शहराचा उगम सात खेड्यातून झाला असला तरी या शहराला संस्थानात्मक इतिहास लाभलेला आहे. ज्यामध्ये कापशीकर घोरपडे घराण्याचा जवळचा संबंध या शहराशी येतो. कापशी घोरपडे संस्थानामधून इचलकरंजी संस्थानाची मुहुर्तम्ढ झाली व विश्वनाथपंत यांचा मुलगा नारोपंत या संस्थानाचा मुळ संस्थापक मानला जातो. या नारोपंतांचा जन्म १६६३ साली झाला असून या नारोपंताचे जीवन हे संघर्षमय असे असून कापशी घराण्याचे संताजी घोरपडे यांच्या लष्करांमध्ये नारोपंतानी आपले कर्तत्व गाजवलेले होते. नारोपंताचे मुळ आडनाव जोशी होते. पुढे संताजी यांच्या नारोपंताच्या प्रेमामुळे नारोपंतांनी आपले आडनाव घोरपडे धारण केले. संताजी घोरपडे यांच्या प्रत्येक मोहिमेवर नारोपंत यांचा सहभाग असायचा. नारोपंत हे संताजी यांच्या गैरहजेरीत जाहागिरीची व्यवस्था पाहत. १६९३ मध्ये नारोपंत यांच्याकडे रामचंद्रपंत अमात्य यांच्या आदेशाने स्वराज्याची व्यवस्था आली. यामुळे नारोजींचा प्रभाव मिरज, इचलकरंजी व कापशी भागात वाढू लागला. सन १७०८ मध्ये बहिरजी घोरपडे यांनी लिहलेल्या एका पत्रामध्ये इचलकरंजी संस्थान असा उल्लेख दिसून येतो व हे पत्र नारोपंत यांना लिहल्यामुळे यावर्षीपासूनच इचलकरंजी संस्थान अस्तित्वात आले असे म्हणावे लागेल.

१७०७ मध्ये छत्रपती शाहू स्वराज्यात आल्यामुळे मराठ्यामध्ये यादवीला प्रारंभ झाला होता. त्याचवेळी संताजीचा मुलगा राणोजी हा कापशीचा जाहगिर बनला होता. परंतू त्याच्या मृत्यूमुळे त्याचा लहान भाऊ पिराजी याच्याकडे जाहगिरी आली. पण पिराजी हा लहान असल्यामुळे नारोजीकडे जाहगिरीची व्यवस्था आली. त्याचदरम्यान पिराजी हा ताराबाईचा सेनानी धनाजी हा शाहू महाराजांकडे सामिल झाल्यामुळे ताराबाईचा सेनापती बनला. याप्रकारच्या घटनाक्रम कोल्हापूर व सातारा संस्थानमध्ये

घडत होत्या. त्याचदरम्यान नारोजींनी आपल्या निधनापर्यंत घोरपडे घराण्याशी एकनिष्ठ राहिले. नारोजींचा पुत्र व्यंकटराव हा नारोजीनंतर वारसदार बनला. ज्याने आपल्या शूर, पराक्रमी व कर्तृत्वाने सातारा व कोल्हापूर गादीवर छाप पाडली. यादरम्यान व्यंकटराव सातारा गादीचे समर्थक बनले व पुढील करवीर संस्थानांशी त्यांचा दुरावा निर्माण होवू लागला. व्यंकटरावांनी त्यांच्या कार्यकिर्दीत इचलकरंजी गावाभोवती डागडुजी करून हे गाव विकसीत केले. व्यंकटराव यांचा मृत्यू १७४५ मध्ये झाला व त्यांच्या निधनानंतर इचलकरंजी संस्थानाचा कारभार अनूबाई यांच्या हाती आला.

व्यंकटरावाचा मुलगा नारायण हा लहान असल्याने संस्थानाची सुत्रे व्यंकटराव यांची पत्नी अनुबाई यांच्या हाती आली. अनुबाई यांनी इचलकरंजी संस्थानाला आकार प्राप्त करून दिला. अनुबाई यांनी आपल्या संस्थानाला पुण्याच्या पेशवे यांचा पाठिंबा मिळवला. अनुबाई यांनी १७५३ मधील नानासाहेबांनी काढलेल्या कर्नाटक मोहिमेमध्ये सहभाग घेवून अतुलनीय पराक्रम दाखविला. अनुबाई यांनी आपल्या मुलाला पराक्रमाचे धडे दिले. पुढे व्यंकटराव व अनुबाई यांचा मुलगा नारायणराव याने १७५९ मध्ये पेशव्यांच्या निजाम विरूद्‌ध भाग घेवून उद्‌गीरच्या लढाईत पराक्रम दाखविला. या घटनाक्रमामध्ये नारायणराव कर्नाटक लढाईत गुंतले असताना करवीर संस्थानाने इचलकरंजी संस्थानावर आक्रमण केले. पुढे १७६१ मध्ये छत्रपती संभाजी यांच्या मृत्यूनंतर अनुबाई यांनी करवीर विरूद्‌ध आक्रमक धोरण आवलंबविले. या प्रकारे इचलकरंजी संस्थान व करवीर संस्थान यांच्यामध्ये संघर्ष चालू होता. यावेळी इचलकरंजी संस्थानाला करवीर संस्थानापासून वाचविण्यासाठी अनुबाई यांनी प्रयत्नाची पराकष्ठा केलेली दिसून येते. अनुबाई यांनी आपली संपूर्ण राजकीय कारकिर्द इचलकरंजी संस्थानाला आकार देण्यास घालविली. १७७० मध्ये नारायणरावाचे निधन झाल्यानंतर अनुबाई यांनी त्यांचा पुत्र व्यंकटराव दुसरा याला नियुक्त केले. १७७४ साली पेशव्या सहाय करत आहात या मुद्यावर अनुबाई उपस्थित इचलकरंजी संस्थानावर आक्रमण केले. अनुबाई यांनी आपले संस्थान सुरक्षित ठेवण्यासाठी नेहमीच पेशव्याची मदत मिळवली पण तोतया भाऊसाहेब प्रकरणात अनुबाई व पेशवे यांच्यात तणाव निर्माण झाला व हे प्रकरण अनुबाई यांना मानसिक व राजकीय हानी निर्माण करणारे ठरले. तरीपण अनुबाई यांनी हे प्रकरण सामोपचाराने घेवून १७७९ साली

संस्थानाच्या राज्यकारभारातून अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला. इचलकरंजी शहराला नारायणरावांच्या मृत्यूनंतर एक खंबीर महिला नेतृत्व अनुबाई यांच्या नावाने लाभले.

सन १७८३ अनुबाईचा मृत्यू झाल्यानंतर व दुसरा व्यंकटरावाच्या लहरीपणामुळे त्याने आत्महत्या केल्याने इचलकरंजी संस्थानाचा कारभार दुसरा व्यंकटरावाची पत्नी रमाबाई यांच्याकडे आला. रमाबाई यांनी नारायणराव बाबासाहेब यांना दत्तक घेवून इचलकरंजी संस्थानाचा कारभार चालविला. पुढे १८१८ मध्ये पेशव्यांची सत्ता नष्ट झाली व इंग्रजाचा राज्यकारभारात प्रवेश झाल्याने इचलकरंजी संस्थानांचे स्वतंत्र अस्तित्व धोक्यात आले होते आणि १८४७ ला इचलकरंजी संस्थान कोल्हापूर संस्थानाच्या अधिपत्याखाली येवून मांडलिक जाहगिरीमध्ये त्याचा समावेश झाला. यावेळी इचलकरंजी संस्थानाचे संस्थापक म्हणजेच जाहगिरदार नारायणराव बाबासाहेबांनी इचलकरंजीचा संपूर्ण चेहरामोहरा बदलून त्याला आधुनिक युगात नेले व याप्रकारे इचलकरंजी गावाने आधूनिक युगात प्रवेश केला.

इचलकरंजी शहराला आधूनिकतेचा स्पर्श करणारे बाबासाहेब हे उच्च शिक्षित होते. ज्यांना न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे यांचे मार्गदर्शन मिळालेले होते. बाबासाहेबांनी आपल्या कार्यकिर्दीमध्ये शेती हा प्रमुख व्यवसाय मानून त्याचा विकास आपल्या संस्थानात केला. नवीन तंत्रज्ञानाच्या जोडीने शेती सुधारण्याचा प्रयत्न केला. आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत केले, वेगवेगळया शाळा स्थापन केल्या, व्यवसायिक शिक्षणाची तरतूद केली, स्त्री शिक्षणाला प्रोत्साहान दिले. बाबासाहेबांच्या कार्यकिर्दीतच लोकशाही सहकाराचा प्रसार झाला, अर्बन क्रेडिट सोसायटी स्थापन झाल्या, अर्बन सहकारी बॅंका व शेतकरी सहकारी सोसायटया निर्माण झाल्या.

बाबासाहेबांच्या कार्यकिर्दीत इचलकरंजीत हातमाग व्यवसायाला प्रोत्साहन मिळाले. या व्यवसायाच्या विकासासाठी बाबासाहेबांनी जातीने लक्ष दिले. भांडवल पुरविले. त्यांच्या प्रयत्नामुळे इचलकरंजी हे सुती रेशमी कापडाची बाजारपेठ बनू लागली. यामुळे इचलकंरजी हे गाव या कोशातून बाहेर पडून शहर म्हणून विकसीत झाले. व आज हे शहर दक्षिण महाराष्ट्रातील मॅचेंस्टर म्हणून ओळखले जावू लागले.

**इचलकरंजी नगरपरिषदेची ऐतिहासिक पार्श्वभूमी:—**

१९ व्या शतकाच्या मध्यापासून महाराष्ट्रातील अनेक नगरांमध्ये नगरपालिकांनी महत्वाची कामगिरी केली आहे, लोकशाही आणि राज्यकारभाराचे प्राथमिक धडे प्रथम ग्रामपंचायती व नगरपालिकेव्दारे प्राप्त होत असतात. बाबासाहेबांनी नगरपालिकेचे महत्व ओळख १ नोव्हेंबर १८९३ रोजी नगरपालिकेची स्थापना केली. या नगरपालिकेची रचना आणि कामकाज पध्दती कोल्हापूरच्या १८८८च्या कायद्याप्रमाणे केली. ज्यावेळी नगरपालिकेची स्थापना केली तेंव्हा नगराची लोकसंख्या ९ हजार १०७ इतकी होती. तसेच नगरपालिका सदस्यांची संख्या १३ इतकी होती. सुरूवातीला नगरपालिकेचा कार्याध्यक्ष व अध्यक्ष लोकप्रतिनिधीव्दारे निवडला जात नसे तर सरकारमार्फत नेमला जाई.

सुरूवातीला नगरपालिकेचे कार्यालय हे नरसोबाच्या मंदिरात होते. परंतू ते ठिकाण अपूरे पडू लागल्याने सन १९११मध्ये पालिकेसाठी नवीन इमारत बांधली. बाबासाहेबांनी यासाठी आर्थिक मदत केली. पुढील काळात ही वास्तु अपूरी पडू लागली म्हणून परत १९२६—२७ मध्ये दुसरे कार्यालय बांधण्यात आले त्यासाठी रूपये १२,००० इतका खर्च आला होता.[१]

इचलकरंजी नगरपालिकेचा कारभार प्रथमपासून योग्य रितीने चालत असे. याचे महत्वाचे कारण म्हणजे बाबासाहेबांचे नगरपालिकेच्या कामकाजावार सतत लक्ष असे. त्यामुळे दरवर्षी नगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होत गेली. १९०४ ते १९२७ च्या काळात बाहेरून कामासाठी येणा—या कामगारांची संख्या वाढल्याने इचलकरंजी नगरपालिकेचे उत्पन्न वाढत गेले. त्या काळात बाबासाहेबांनी शहरात येणा—या मालावर कोणत्याही प्रकारची जकात आकारली जाऊ नये असे धोरण स्विकारले होते. याचा परिणाम नगरपालिकेच्या उत्पन्नावर जरी होत असला तरी व्यापारवृध्दीसाठी त्याची बरीच मदत झाली.[२]

सन १९२७ साली नगरपालिकेस टाऊन म्युनिसिपलचा दर्जा प्राप्त झाला आणि त्याचबरोबर ही संख्या बहुतांशी लोकनियुक्त प्रतिनिधींची करण्यात आली. सरकार नियुक्त सदस्यांचे यानंतरच्या काळात महत्व संपुष्टात आले. यावेळी सभासदांची संख्या १८ इतकी होती. त्यामध्ये ९ सदस्य लोकांनी निवडले होती आणि तीन सदस्य

बिनसरकारी निवडलेले होते. ६ सदस्य हे सरकारी होते. नगरपालिकेच्या अध्यक्षपदाची निवड मात्र लोकनियुक्त मतदारांतूनच होत असे. १९३० साली ही संख्या लोकल सेल्फ गव्हर्न्मेंट इन्स्टिट्यूट, मुंबई या संस्थेची सभासद झाली. बाबासाहेबांच्या कारकिर्दीच्या पन्नासाव्या वर्षी म्हणजे १९४२ मध्ये येथील नगरपालिकेस कोल्हापूर नगरपालिकेचा दर्जा प्राप्त झाला. त्यामुळे सरकार नियुक्त सभासदाची संख्या परत कमी होऊन लोकप्रतिनिधींचा सहभाग अधिक वाढला.

सन १९४५ नंतर लोकनियुक्त सदस्यांकडून नगरपालिकेच्या कामाचा विस्तार होत गेला. पुढे १९४७ मध्ये लोकनियुक्त सदस्यांची संख्या १३ वरून २० पर्यंत वाढली. यामध्ये महिला, मागासवर्गीय व मुस्लिम वर्गासाठी काही जागा राखीव ठेवण्यात आल्या.

इचलकरंजी नगरपालिकेची स्थापना झाली. त्यावेळी पालिकेची प्रशासन यंत्रणा ही लोकनियुक्त नव्हती, तर ती यंत्रणा सरकारकडून निवडली जात असे. नगरपालिका अध्यक्ष म्हणून सरकारी अधिका–यांची नेमणूक सरकारच करीत असे. हे सरकारी अधिकारी कर्मचा–यांना सूचना देत असत व त्याची अमंलबजावणी पालिका कर्मचारी करीत.इचलकरंजी नगरपालिकेची स्थापना १८९३ मध्ये झाली स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४८ साली बाळासाहेब चिवटे हे पहिले नगराध्यक्ष म्हणून निवडून आले. कोल्हापूर ब्रो ॲक्टखाली इचलकरंजी शहराचे एकुण पाच विभाग पाडले व प्रत्येक विभागात ४ असे एकुण २० उमेदवार उभे करावेत त्याचप्रमाणे स्त्रियांसाठी, अल्पसंख्याकांसाठी, हरिजन व मुस्लिमांसाठी जागा राखीव ठेवण्यात आल्या.

**इचलकरंजी नगरपालिकेची रचना:—**

इ. स. १६८७ मध्ये ब्रिटिशांनी प्रथमच इंग्लिश ब्युरोजच्या धर्तीवर मद्रास महानगरपालिकेची स्थापना केली. १९७३ च्या सनदी कायद्यानूसार मद्रास, मुंबई व कलकत्ता येथे नगरपालिका प्रशासनाची स्थापना करण्यात आली.लहान नागरी क्षेत्रासाठी नगरपरिषद स्थापन केली जात असून महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषद अधिनियम अमलात आला. त्या तारखेपासून भारतीय सविधान कलम २४३ थ च्या उपकलम २ अन्वये लहान नागरी क्षेत्राला नगरपरिषद म्हणून ओळखले जाते. या नगरपरिषद स्थापन करायचे निकष १९९४ पूर्वी वार्षिक

उत्पन्नानूसार ठरविले जात होते. पण सध्या हे निकष लोकसंख्येच्या आधारावर ठरविले जातात. तसेच नगरपालिकेऐवजी नगरपरिषद हा शब्द सध्या वापरला जातो. महाराष्ट्र नगरपरिषदेची रचना अ, ब आणि क अशा तीन प्रकारात दिसून येते.

| श्रेणी किंवा दर्जा वर्ग | महाराष्ट्र नगरपरिषदेची सदस्यसंख्या | लोकसंख्येचे निकष |
|---|---|---|
| अ | २५ | १ लाखापेक्षा अधिक |
| ब | ६२ | ४०हजार ते १ लाख |
| क | १४२ | २५ ते ४० हजार |

वरील रचनेनूसार इचलकरंजी नगरपरिषद ही"अ" श्रेणीमध्ये येत असून नगरपरिषदेचे सर्व निकष या शहराची नगरपरिषद पूर्ण करते.

१. इचलकरंजी नगरपरिषद:—

इचलकरंजी नगरपरिषदेत एक परिषद असून ही परिषद नगरपरिषदेच्या क्षेत्रातील निर्वाचीत व नामनिर्देशित सदस्यांची मिळून असते. जिल्हा निगम निहाय असा दर्जा प्राप्त असतो. ही परिषद अधिकार संपन्न असून या परिषदेला स्वत:ची मालमत्ता बाळगण्याचा अधिकार असतो. या परिषदेतील सदस्य निर्वाचित सदस्य नामनिर्देशित सदस्य आणि सदस्य अशा दोन प्रकारच्या असतात. यातील इचलकरंजीतील नगरपरिषदेतील निर्वाचीत सदस्यांची संख्या ५७ आहे. इचलकरंजी नगरपरिषदेमध्ये आरक्षणाची तरतूद असून एकुण सदस्यापैंकी अनुसुचित जाती जमातीतील ०८ सदस्यांना राखीव जागा आहेत. तर इतर मागास वर्गाना १३ जागा राखीव आहेत. तसेच एकुण सर्वसाधारण निर्वाचीत सदस्यापैंकी १० जागा महिलांसाठी राखीव आहेत. या निर्वाचीत सदस्यांची निवड प्रौढगुप्त प्रत्यक्ष मतदान पध्दतीने होत असते. प्रत्येक निर्वाचीत सदस्य हा वार्डचा प्रतिनिधी असतो व प्रत्येक वार्डमधून एक सदस्य निवडला जातो. यानूसार इचलकरंजी नगरपरिषदेमध्ये १४ वॉर्ड असून या वॉर्डमध्ये ५७ सदस्य निवडले जातात.

इचलकरंजी नगरपरिषदेतील परिषदातील सदस्यांची पात्रतेमध्ये तो भारताचा नागरिक असावा, इचलकरंजी क्षेत्रातील मतदार यादीत त्याचे नाव असावे, त्याचे वय वर्ष २१ पूर्ण असावे, त्याचबरोबर तो जर इचलकरंजी नगरपरिषदेतील आरक्षित जागेमधून निवडणूक लढवणार असेल तर तो त्याच जागेसंबंधी सर्व अटी पूर्ण करणारा

असला पाहिजे त्याला शिक्षा अथवा गैरवर्तनासाठी पदभ्रष्ट केले गेले नसले पाहिजे अशा प्रकारचा सदस्य इचलकरंजी नगरपरिषदेतील परिषदेत निवडुन येण्यास पात्र ठरतो. याचबरोबर परिषदेतील सदस्य दिवाळखोर, वेडा, थकबाकीदार, ठेकेदार, त्र खोटा असला तर तो अपात्र ठरू शकतो.

इचलकरंजी नगरपरिषदेचा कार्यकाल हा ७४ व्या घटनादुरूस्तीनूसार ५ वर्षाचा असून महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५मधील कलम३१३ नूसार कार्यकाल पूर्ण होण्याअगोदर ही नगरपरिषद राज्यशासन बरखास्त करू शकते. नगरपरिषद अधिनियमानूसार इचलकरंजी नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभा व खास सभा अशा दोन सभा होत असतात. यातील सर्वसाधारण सभा ही नियोजीत वेळेनूसार होत असते. तर खास सभा ही विशेष कामासाठी बोलविली जात असते.

नगरपरिषदेचा नगरअध्यक्ष शहराचा प्रथम नागरिक असतो. त्याअनुषंघने इचलकरंजी नगरपरिषदेचा नगरअध्यक्ष हा इचलकरंजी शहराचा प्रथम नागरिक असून याची निवड महाराष्ट शासनाच्या २८ जून २००६ रोजी घेतलेल्या राज्यमंत्री मंडळानूसार अप्रत्यक्षपणे होते ज्यामध्ये नगरसेवक हे नगरअध्यक्षांची निवड करतात. या नगरअध्यक्षाच्या पदाला ७४ व्या घटना दुरूस्तीनूसार आरक्षणाची तरतूद लागू असून त्याचा कार्यकाल २००१ पासून पाच वर्षाचा करण्यात आला आहे. नगरअध्यक्ष हा कार्यकाल पूर्ण होण्याअगोदर त्याचा राजीनामा जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांच्याकडे देवू शकतो. तसेच त्याच्यावर अविश्वास ठरावही येवू शकतो. नगरपरिषदेच्या नगरअध्यक्षाचे मानधन हे नगरपरिषदेच्या दर्जावरून ठरत असते. त्यानूसार इचलकरंजी नगरपरिषदेतील नगरअध्यक्षाचे मानधन ३,५००/—इतके आहे. या नगरअध्यक्षाच्या सहकार्यासाठी एक उपनगरअध्यक्ष असतो. सध्या इचलकरंजी नगरपरिषदेची नगरअध्यक्ष मा. सौ. बिस्मिल्ला अहमद मुजावर व उपनगरअध्यक्ष मा. श्री. संजय महादेव कांबळे आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी:— महाराष्ट्र नगरपरिषदेच्या प्रशासकला मुख्याधिकारी म्हणून संबोधले जात असून महाराष्ट नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ७५ नूसार या मुख्याधिकारीची तरतूद केली असून या मुख्याधिकारीचा दर्जा व निवड नगरपरिषदेच्या श्रेणीवरून ठरतो. तसेच हे पद

राज्यसेवेतील असल्याने त्याची नेमणूक राज्यशासन करते. यानूसार इचलकरंजी नगरपरिषदेचा मुख्याधिकारीचा दर्जा हा उपजिल्हाधिकारी दर्जाचा आहे व याचा कालावधी तीन वर्षाचा असून यानंतर याची बदली राज्यशासन करते. हा मुख्याधिकारी महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम,१९६५ मधील कलम ७७, १ नूसार नगरअध्यक्ष यांच्या सल्ल्याने बैठक बोलविणे, ठरावांची अमलबजावणी करणे, परिषदेच्या लेखांकनाची व अहवालाची तपासणी करणे, तसेच नगरपरिषदेच्या सर्व कामकाजावर नियत्रंण व देखरेख ठेवण्याचे कार्य करते.

इचलकरंजी नगरपरिषदेची कार्ये: महाराष्ट्र नगरपरिषद,नगरपंचायत व औद्योगिक नागरी अधिनियम , १९६५ मधील कलम ४९ नूसार पुढीलप्रमाणे अनिवार्य कार्ये नगरपरिषदेला करावी लागतात.

१. सार्वजनिक रस्ते,जागा,इमारती,येथे दिवाबत्तीची सोय करणे, तसेच स्वच्छता राखणे.

२. सार्वजनिक पिण्याची पाण्याची व्यवस्था राबविणे, तसेच शौचालय,स्नानगृहे उभारणे.

३. रस्त्यांना व चौकानां नावे व क्रमांक देणे, जन्म—मृत्यूची नोंद ठेवणे, प्राथमिक शाळा सुरू करणे व त्यांची व्यवस्था पाहणे.

४. धोक्याच्या इमारती पाडणे, तेथील लोकांचे पुर्नवसन करणे, स्मशानाची व्यवस्था करणे, सार्वजनिक लस टोचणी मोहिम, कुटुंब नियोजन कल्याणकारी कार्यक्रम राबविणे, मालमत्ता कर, व्यवसाय कर, मनोरंजन कर लावणे व ते गोळा करणे, प्रशासनाचा वार्षिक अहवाल तयार करणे इत्यादी प्रकारचे अनिवार्य कार्ये नगरपरिषदेला करावी लागतात. त्याच जोडीला नगरपरिष्द आपल्या उपलब्ध संसाधनानुसार शहराच्या विकासाच्यादृष्टीने विविध जन कल्याणाची कार्ये पार पाडत असते.

प्रस्तुत प्रकरणामध्ये इचलकरंजी शहराची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करून सांगितली आहे. तसेच इचलकरंजी नगरपरिषदेचा ऐतिहासिक विकासक्रमाचा आढावा घेवून नगरपरिषदेची रचना स्पष्ट करून नगरपरिषदेची कार्यप्रणाली विस्तृतपणे मांडली आहे.

संदर्भ सूची ः


१.महाराष्ट्र राज्य गॅसेटिअर, कोल्हापूर जिल्हा, शासकीय मुद्रणालय,१९८९

. 2.Dr.Chandravadan Naik,History of ichalkaraji City, Suchita Publication,2006.

३.डॉ.बी.एल. फडिया, भारतीय शासन व राजनीति, साहित्य भवन पब्लिकेशन, २००८

४.पवार (डॉ) जे. के.,भारत वय वर्षे ६०, राजप्रकाशन कोल्हापूर , २००९

५.डॉ.शांताराम भोगले, लोकप्रशासना सिंध्दात व कार्यपध्दती , कैलास पब्लीकेशन गोकुळवडो औरंगपूर,औरंगाबाद

६.संतोष दस्ताने, भारत एक पाहणी , दस्ताने रामचंद्र आीण कंपनी.